<u>प्रेसनोट दिनांक १५/०६/२०१९</u>
<u>पोलीस स्टेशन- येरवडा पोलीस स्टेशन, पुणे</u>

**कम्युनिटी पोलीस संकल्पने अंतर्गत जनसेवा बँक, कल्याणीनगर रोड, येरवडा, पुणे येथील अधिकारी व कर्मचारी यांची बैठक घेऊन सुरक्षेच्या दृष्टीने मार्गदर्शन केलेबाबत...**

---

कम्युनिटी पोलीसींग व सहकार्यातून सुरक्षेकडे (सीसीटीव्ही कॅमेरे प्रकल्प) या संकल्पने अंतर्गत श्री.अजय वाघमारे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), अति.कार्यभार वरिष्ठ पो.निरी.,येरवडा पो.स्टे. यांचे मार्गदर्शनाखाली येरवडा पो.स्टे.कडील पो.उप.निरी. श्री. व्ही.जे.माने यांनी दि.१३/०६/२०१९ रोजी १३:३० वा. ते १४:०५ वा.चे दरम्यान येरवडा पो.स्टे.चे हद्दीतील जनसेवा बँक, कल्याणीनगर रोड, येरवडा, पुणे येथे भेट देवून तेथील महिला व पुरूष अधिकारी, कर्मचारी, सुरक्षा रक्षक यांची बैठक घेतली. त्यांचेशी चर्चा करून त्यांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या. त्यांना पुणे शहर पोलीस आयुक्तालयाकडून नागरिकांकरीता राबविण्यात येत असलेल्या विविध १४ योजनांची माहिती दिली. पोलीस आयुक्त कार्यालय येथे महिला, जेष्ठ नागरिक व बालकांचे संदर्भातील तक्रारींचे निराकरण करण्यासाठी सुरू केलेल्या भरोसा सेलची माहिती दिली. बँक व्यवहारा संदर्भात घडणारे गुन्हे, ऑनलाईन फसवणूकीचे गुन्हे, एटीएम, बँकेची सुरक्षा इत्यादी बाबत माहिती देवून मार्गदर्शन केले. तसेच सहकार्यातून सुरक्षेकडे या संकल्पने बाबत माहिती देवून सीसीटीव्ही कॅमेरे बसविणेबाबत आवाहन केले.

अशा प्रकारे श्री.अजय वाघमारे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), अति.कार्यभार वरिष्ठ पो.निरी. यांचे मार्गदर्शनाखाली येरवडा पोलीस स्टेशन कडील पो.उप.निरी. श्री. व्ही.जे.माने यांनी जनसेवा बँक, कल्याणीनगर रोड, येरवडा, पुणे येथे भेट देवून तेथील अधिकारी, कर्मचाऱ्यांची बैठक घेवून सुरक्षे संदर्भात मार्गदर्शन करून सीसीटीव्ही कॅमेरे बसविणेबाबत आवाहन करून उल्लेखनिय कामगिरी केली आहे.




**( अजय वाघमारे )**
पोलीस निरीक्षक (गुन्हे)
अति.कार्यभार व.पो.निरीक्षक,
येरवडा पोलीस स्टेशन, पुणे



